
प्रकरण
१५

# राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (Directive Principle of State Policy)




## राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांची घटनात्मक तरतुद

- घटनेच्या भाग 4 मधील कलम 36 ते कलम 51 दरम्यान तरतुद आहे.
- मात्र, प्रत्यक्ष मार्गदर्शक तत्वे कलम 38 ते कलम 51 मध्ये आहेत.

---

## राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वाची वैशिष्ट्ये

- आयर्लंड ने ही संकल्पना स्पेनच्या घटनेतून (1931) घेतली.
- भारतीय घटनाकारांनी 'आयर्लडच्या (1937)' मधील राज्यघटनेतून मार्गदर्शक तत्वे भारतीय घटनेत घेतली.
- UNO ने 1948 साली मांडलेल्या मानवी हक्कांच्या वैश्विक जाहिरनाम्याचा प्रभाव मार्गदर्शक तत्वे वर दिसून येतो.
- धोरणे व कायदे करताना राज्यांनी विचारात घ्यावयाचे आदर्श हे मार्गदर्शक तत्वातून व्यक्त होतात.
- 1935 च्या भारत सरकार कायद्यामधील सुचनापत्राचा समावेश भारतीय घटनेत केला ते म्हणजेच मार्गदर्शक तत्वे होय.
- मार्गदर्शक तत्वे देशात आर्थिक व सामाजिक लोकशाही स्थापन करण्याचा उद्देश ठेवतात. (राजकीय नाही)
- मार्गदर्शक तत्वांना न्यायालयीन पुनर्विलोकन लागू नाही.
- ही तत्वे पोलिस राज्याच्या जागी कल्याणकारी राज्यास रुप देण्याचा प्रयत्न करतात. (मार्गदर्शक तत्वांवर–नैतिक व राजकीय बंधने आहेत)
- मार्गदर्शक तत्वे न्यायप्रविष्ट नसले तरी न्यायालयांना एखाद्या कायद्याची घटनात्मक वैधता तपासण्यासाठी मदत करतात.
- घटनेत मार्गदर्शक तत्वांचे कसल्याही प्रकारचे वर्गीकरण दिलेले नाही. मार्गदर्शक तत्वे हे सकारात्मक असून राज्यांना बंधनकारक नाहीत.
- सर बी.एन. राव : मार्गदर्शक तत्वे न्यायप्रविष्ट असू नयेत अशी सुचना. (घटनेचे सल्लागार)

---

## राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे

- **कलम 36 :** 'राज्यसंस्था' या शब्दाची व्याख्या.
  - भाग 3 मधील कलम 12 प्रमाणे असेल.

---

- **कलम 37 :** भाग 4 मधील तत्वे न्यायप्रविष्ट नसतील, पण ही तत्वे देशासाठी महत्वाचे कायदे करताना अंमलात आणण्याचे कर्तव्य राज्यांचे असेल.

---

- **कलम 38 :** लोककल्याणास चालना देण्यासाठी राज्य समाज व्यवस्था निर्माण करेल.
  - **38 (1) :** राज्य हे सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायातून शक्य तेवढ्या लवकर समाज व्यवस्था प्रस्थापित करुन लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करेल.
  - **38 (2) :** राज्य, केवळ व्यक्ती मध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळ्या व्यवसायात गुंतलेल्या लोकसमुहाला देखील, उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न करेल.
  - वरील तरतुद, "**44 वी घटनादुरुस्ती 1978 अन्वये**" आली.

---

- **कलम 39 :** राज्यांनी अनुसरवयाची धोरणविषयक काही तत्वे. (39 a ते 39 f)

- **कलम** 39 (a) **:** सर्व नागरिकांना उपजीविकेचा पुरेसा हक्क असेल. तो पुरुष व स्त्रीला सारखा असेल.

- **कलम** 39 (b) **:** सामूहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी.

- **कलम** 39 (c) **:** आर्थिक यंत्रणा राबविण्याचा परिणाम म्हणून संपत्तीचा व उत्पादन साधनांचा संचय सामूहिक हितास बाधक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी होऊ नये.

- **कलम** 39 (d) **:** पुरुष व स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.

- **कलम** 39 (e) **:** स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करुन घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलवणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये.

- **कलम** 39 (f) **:** बालकांना निरामय पध्दतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्याबाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे. वरील तरतुद '**42 वी घटनादुरुस्ती** 1976' अन्वये समाविष्ट केली.

- **कलम** 39 A **:** समान न्याय व नि:शुल्क कायदे सहाय्य : राज्य, समान संधीच्या तत्वावर न्यायास प्रोत्साहन देईल व आर्थिक बाबीमुळे नागरीकाला न्याय मिळण्याची संधी नाकारली जावु नये यासाठी मोफत कायदे विषयक सहाय्य देईल.
  - वरील तरतुद '**42 वी घटनादुरुस्ती** 1976' अन्वये आली.

- **कलम** 40 **:** ग्रामपंचायती संघटन करणे.
  - राज्य, ग्रामपंचायत संघटीत करण्यासाठी उपाययोजना करील.

- **कलम** 41 **:** कामाचा, शिक्षणाचा, व विशिष्ट बाबतीत सार्वजनिक सहाय्याचा हक्क. (लोकसहाय्य) : हा हक्क आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत मिळतो.
  - **हे कलम 4 घटकांची तरतुद करते :** 1. बेरोजगार (बेकारी) 2. वृध्दत्व (वार्धक्य) 3. आजारपण 4. अपंगत्व (विकलांगता)

- **कलम** 42 **:** कामाच्या ठिकाणी न्याय वागणुक व प्रसुती सहाय्य :
  1. कामाच्या ठिकाणी न्याय वागणुक
  2. मातृत्व लाभ (प्रसुती सहाय्य)

**कलम** 43 **:** राज्य, शेतकी, औद्योगीक अथवा अन्य सर्व प्रकारच्या कामगारांना काम, निर्वाहवेतन, समुचित जीवनमान व सामाजीक तसेच सांस्कृतिक संधीचा पुर्ण उपयोग याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करील. आणि विशेषत: ग्रामीण क्षेत्रांमध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्वावर कुटीरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

- **या कलमात 2 बाबींचा समावेश होतो.**
  1. कुटीरोद्योगांना प्रोत्साहन (गांधीवादी)
  2. निर्वाह वेतनाची तरतुद (समाजवादी)

- **कलम** 43 A **:** औद्योगिक व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग.
  - राज्य, औद्योगिक व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग वाढवण्यासाठी कायद्याने उपाययोजना करेल.
  - वरील तरतुद '**42 वी घटनादुरुस्ती** 1976' अन्वये आली.

- **कलम** 43 B **:** सहकारी सोसायट्यांना चालना देणे.
  - राज्य, सहकारी सोसायट्यांची निर्मीती व व्यवस्थापन यास प्रोत्साहन देईल.
  - वरील तरतुद '97 **व्या घटनादुरुस्ती** 2011' अन्वये समाविष्ट करण्यात आली.

- **कलम 44 :** नागरिकांसाठी समान नागरी कायदा. भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र समानता एकरुपता लाभावी यासाठी राज्य प्रयत्न करील.

- **कलम 45 :** 0 ते 6 वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांच्या बाल्य अवस्थेची देखभाल व शिक्षण याबाबत तरतुद.
  - वरील कलमात '**86 व्या घटनादुरुस्ती 2002**' अन्वये बदल करण्यात आले.
  - पुर्वी, 14 वर्षापर्यंत मुलांना नि:शुल्क व अनिवार्य शिक्षण देण्यात यावे अशा आशयाचे हे कलम होते.

- **कलम 46 :** अनु.जाती, अनु.जमाती आणि इतर दुर्बल घटकांचे शैक्षणिक व आर्थिक हित संवर्धन.
  - राज्य, अनुसूचित जाती व जमाती, इतर दुर्बल घटकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन काळजीपुर्वक करील व त्यांचे सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासुन रक्षण करील.

- **कलम 47 :** पोषणमान व राहणीमान उंचावणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य.
  1. पोषणमान व जीवनाचा दर्जा उंचावणे व सार्वजनिक आरोग्यत सुधारणा करणे. (समाजवादी)
  2. आरोग्याला घातक असलेले अमली पदार्थ व पेय घेण्यावर बंदी घालणे (गांधीवादी)

- **कलम 48 :** कृषी आणि पशुसंवर्धन यांची संघटन.
  1. पोषणमान व शास्त्रीय पध्दतीने कृषी व पशुसंवर्धन करणे. (उदारमतवादी)
  2. गायी, वासरे, दुभती जनावरे, ओढकामाची जनावरे यांच्या जातीचे जतन करणे व कत्तलीस मनाई करणे. (गांधीवादी)

- **कलम 48 A :** राज्य, देशाच्या पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वने व वन्यजीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करील. वरील कलमाचा समावेश **42 व्या घटनादुरुस्तीने** करण्यात आला.

- **कलम 49 :** राष्ट्रीय महत्वाची स्मारके, स्थाने व वस्तु यांचे संरक्षण : कायद्याने घोषित केलेली ऐतिहासीक स्थळे यांचे संरक्षण. (लुट, विद्रुपण, नाश, स्थलांतरण, विल्हेवाट अथवा निर्यात)

- **कलम 50 :** न्यायव्यवस्था कार्यकारी व्यवस्थेपासुन अलग : राज्यांच्या लोकसेवेमध्ये न्यायव्यवस्था ही कार्यकारी यंत्रणेपासुन अलग ठेवल्या.

- **कलम 51 :** आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी राज्य :
  - आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करणे.
  - राष्ट्रांराष्ट्रात न्यायसंगत सन्मानपुर्वक संबंध राखणे.
  - आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे सोडवण्यास प्रोत्साहन देणे.
  - आंतरराष्ट्रीय कायदा व तह यातील कर्तव्यांचा मान राखणे.
  - या तत्वावर पंडित जवाहरलाल नेहरुंचा प्रभाव दिसून येतो.

## मार्गदर्शक तत्वे आणि घटनादुरुस्ती

**भाग 4 मधील घटनादुरुस्त्या – एकुण 4 घटना दुरुस्त्या आहेत.**

- **42 वी घटनादुरुस्ती :** कलम 39f, 39 A, 43 A, 48 A (42 वी घटनादुरुस्ती लागु – 3 जानेवारी 1977)
- **44 वी घटनादुरुस्ती :** 38 (2) (44 वी घटनादुरुस्ती लागु – 20 जुन 1979)
- **97 वी घटनादुरुस्ती :** कलम 43 B (97 वी घटनादुरुस्ती लागु – 12 जानेवारी 2012)
- **7 वी घटनादुरुस्ती :** कलम 49 मध्ये कायद्याने घोषीत ऐतिहासिक असा बदल केला.
- **भाग 4 मध्ये 4 नवीन मार्गदर्शक तत्वांचा समावेश झाला :** 39 **A**; 43 **A**; 43 **B**; 48 **A**

### ❊ भाग 4 वरील विविध मते व टीका ❊

| | | |
|---|---|---|
| 1. | • जर DPSP ची खरोखर पुर्ण अंमलबजावणी झाली तर भारत पृथ्वीवरील स्वर्ग बनेल. | माजी सरन्यायाधीश एम.सी.छागला |
| 2. | • DPSP ना 19 व्या शतकातील तत्वज्ञान संबोधले<br>• DPSP केवळ पवित्र आकांक्षा आहेत.<br>• मार्गदर्शक तत्वे ही भारतात समाजवाद नसलेला फेबियन समाजवाद निर्माण करतात. | सर आयवर जेनिंग्ज |
| 3. | • DPSP ना तर्कशुध्द मांडणी नाही अशी टीका | एन श्रीनिवासन |
| 4. | • DPSP ना Dious Superfluous अशी टीका<br>• DPSP म्हणजे बँकेच्या सोयीनुसार वटवता येणारा चेक<br>• बाहेरुन सुंदर मात्र आतून पोकळ<br>• केवळ आदर्शवादी विचार | के.टी.शहा. |
| 5. | • अ-वाद्योग्य व अमुर्त | अनंत नारायणन् |
| 6. | • यामागील हेतु (DPSP) भारताला पोलिसराज्य न बनवता कल्याणकारी राज्य बनवणे हा आहे. | के.व्ही.राव |
| 7. | • इतर गोष्टी करण्यासाठी शासनास दिलेल्या विधायक सुचना | ॲलन ग्लॅडहिल |
| 8. | • DPSP मुळे घटनेला अपकीर्ती प्राप्त होईल.<br>• नैतिक उपदेश | डॉ. के.सी. व्हेअर |
| 9. | • राजकीय लोकशाहीपासून वेगळी असणारी आर्थिक लोकशाही | बी.आर. आंबेडकर |
| 10. | • DPSP व FR राज्यघटनेची सदसदविवेक बुध्दी व सामाजिक क्रांतीची ध्येये पुढे नेण्याकडे रोख | ग्रॅनव्हिल ऑस्टीन |
| 11. | • ही तत्वे नववर्षाच्या निश्चयापेक्षा अधिक नाहीत ते जानेवारीच्या दुसऱ्याच दिवशी मोडली जातात | नसिरुद्दीन अहमद |
| 12. | • भावनांची कचरापेटी | टी.टी. कृष्णम्माचारी |
| 13. | • DPSP म्हणजे उद्दीष्ट व आकांक्षा यांचे घोषणापत्र | के.सी. व्हेअर |
| 14. | • राज्यांच्या अधिकाऱ्यासाठी नैतिक नियम आहेत त्यांना शैक्षणिक मुल्ये आहेत. | सर बी.एन. राव |
| 15. | • आर्थिक क्षेत्रातील समाजवाद | के.एम. पण्णीकर |
| 16. | • मार्गदर्शक तत्वे न्यायप्रविष्ट नसली तरीही न्यायालयास अर्थ लावताना अनेकवेळा त्यांचा उपयोग झाला आहे.<br>• मार्गदर्शक तत्वे ही प्रस्तावनेला पुर्ण रुप देतात. ही नागरीकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता देतात. | एम.सी.सेटलवाड |
| 17. | • मार्गदर्शक तत्वे जनतेच्या कल्याणाला प्रोत्साहन देणारे आहेत. | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| 18. | • मार्गदर्शक तत्वात समाजवादी सरकारची बिजे रोवली आहेत. | एस.व्ही.कृष्णमुर्ती |
| 19. | • मार्गदर्शक तत्वे अमुल्य आहेत. | हृदयनाथ कुंझरु |

| | | |
|---|---|---|
| 20. | मार्गदर्शक तत्वे असंसदात्मक, लोकशाही विरोधी आहेत. | काझी सय्यद करीमुद्दीन |
| 21. | भाग 4 ची 1935 च्या भारत सरकार कायद्यामधील सुचनांशी तुलना केली आहे. | डॉ. बाबासेहब आंबेडकर |
| 22. | मार्गदर्शक तत्वे संविधानाचे प्राण/सार आहे. | पंडित ठाकूरदास भार्गव |
| 23. | मार्गदर्शक तत्वे हा असा महत्वपूर्ण भाग आहे जो राज्यांच्या प्रशासकीय धोरणाला तयार करेल. | शिब्बनलाल सक्सेना |
| 24. | मार्गदर्शक तत्वांनी कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, पंतप्रधान, मुख्यमंत्री यामधील वादास जन्म दिला. | के. संथानम |
| 25. | मार्गदर्शक तत्वे ही घटनेला जीवन प्रदान करणाऱ्या तरुतुदी आहेत. | एल.एम. सिंघवी |
| 26. | लोकांना जबाबदार असलेले कोणतेही मंत्रिमंडळ घटनेच्या भाग 4 मधील तरतुदींकडे दुलर्क्ष करु शकत नाही. | अल्लादी कृष्णस्वामी अय्यर |
| 27. | जनतेच्या मतांवर आधारित असलेले सरकार धोरण ठरवितांना मार्गदर्शक तत्वांकडे अजिबात दुर्लक्ष करु शकत नाही. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| 28. | मार्गदर्शक तत्वे म्हणजे घटनेला जीवन प्रदान करणाऱ्या तरतूदी आहे. | एन.एम. सिंघवी |
| 29. | मार्गदर्शक तत्वे ही राज्यसंस्थेच्या प्राधिकारांसाठी नैतिक तत्वे आहेत, त्यांच्यात किमान शैक्षणिक मूल्य An Educational Value आहे. | बी.एन.राव. |

**(मार्गदर्शक तत्वे = DPSP)**

### ✻ मुलभूत हक्क (F.R) व मार्गदर्शक तत्वे (DPSP) यांचा विरोधाभास ✻

| | | |
|---|---|---|
| 1. | चंपकम दोराईराजन खटला विरुध्द मद्रास राज्य 1951 | F.R व DPSP वाद झाल्यास मुलभुत हक्क (F.R) श्रेष्ठ असतील. |
| 2. | गोलकनाथ खटला विरुध्द पंजाब राज्य 1967 | F.R दैवी आहेत. त्यामुळे DPSP च्या अंमलबजावणीसाठी F.R बदलता/दुरुस्ती करता येणार नाही. |
| 3. | मिनर्व्हा मिल्स खटला विरुध्द भारत संघराज 1980 | भारतीय राज्यघटना F.R व DPSP यांच्या योग्य संतुलनावर आधारलेली आहे. |

### ✻ भाग (IV) च्या बाहेरील मार्गदर्शक तत्वे (DPSP) ✻

- **कलम 335 (भाग XVI) :** नागरी सेवा व पदावर नियुक्ती करताना अनुसूचित जाती व जमाती यांना दिलेले हक्क.
- **कलम 350 A (भाग XVII) :** भाषीक अल्पसंख्यांकांना प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाच्या सोयी.
- **कलम 351 (भाग XVII) :** हिंदी भाषेचा विकास हे संघराज्याचे कर्तव्य असेल.

### ✻ मार्गदर्शक तत्वांची उपयुक्तता ✻

- मार्गदर्शक तत्वे भारतीय घटनेच्या प्रस्ताविकेत नमुद असलेल्या वेगवेगळ्या तत्वांची अंमबजावणी करतात.
- सरकारच्या कामकाजाचे परीक्षण करतांना त्यांचा उपयोग होतो.
- सर्वोच्च न्यायलयाला घटनेचा अर्थ लावताना त्यांचा उपयोग होतो.

## ✼ वर्गीकरण ✼

### ✼ घटनेत नसुन ते अभ्यासकांनी केले ✼

| समाजवादी तत्वे | गांधीवादी तत्वे | उदारमतवादी/बुध्दीवादी तत्वे |
|---|---|---|
| कलम 38<br>कलम 39<br>कलम 39 A<br>कलम 41<br>कलम 43 (2) निर्वाहवेतन<br>कलम 43 A<br>कलम 47 (1) पोषण व जीवनमानाचा दर्जा उंचावणे. | कलम 40<br>कलम 43 (1) : कुटीर उद्योगांना प्रोत्साहन<br>कलम 46<br>कलम 47 (2) अंमलीपदार्थ बंदी<br>कलम 48 (2) जनावरे हत्या बंदी<br>कलम 43 B सहकारी सोसायटींची स्थापना | कलम 44 (1) : कुटीर उद्योगांना प्रोत्साहन<br>कलम 45<br>कलम 48 (1) आधुनिक शास्त्रीय जनावरे व कृषी<br>कलम : 49<br>कलम : 50<br>कलम : 51 |

| मुलभूत हक्क | मार्गदर्शक तत्वे | मुलभुत कर्तव्ये |
|---|---|---|
| भाग 3 | भाग 4 | भाग 4 (A) |
| सर्व भारतीयांना तर काही परकीयांना लागु | राज्यांना लागु | भारतीय नागरिकांना लागु |
| राजकीय लोकशाही दाखवतात | सामाजिक, आर्थिक लोकशाही दाखवतात | नागरिकांना कर्तव्ये दाखवतात |
| न्यायप्रविष्ट आहेत. | न्यायप्रविष्ट नाहीत. | न्यायप्रविष्ट नाहीत. |
| काही सकारात्मक व काही नकारात्मक | फक्त सकारात्मक | फक्त सकारात्मक |
| घटनेत मुळतः होते. | घटनेत मुळतः होते | घटनेत मुळतः नव्हते. |
| अमेरिकेकडून स्विकार केला. | आयर्लंड कडून स्विकार केला. | रशियाकडून स्विकार केला. |
| उल्लंघन झाल्यास शिक्षा होते. | उल्लंघन झाल्यास शिक्षा होत नाही. | उल्लंघन झाल्यास शिक्षा होत नाही. |
| काही आपोआप अंमलात येतात तर काहींसाठी कायदा करावा लागतो. | सर्वांच्याच अंमलबजावणीसाठी कायदा करावा लागतो. | सर्वांच्याच अंमलबजावणीसाठी कायदा करावा लागतो. |

| मार्गदर्शक तत्वे | संबंधित मार्गदर्शक तत्वे | |
|---|---|---|
| • कामागार वर्गाचे हितसंबंध : 39(e), 39(d), 39(a), 43, 43 A | • किमान वेतन कायदा, 1948<br>• कामगार संघटना कायदा, 1926<br>• कंत्राटी कामागार कायदा, 1970 | • औद्योगिक विवाद कायदा, 1947<br>• कारखाना कायदा, 1948<br>• बोनस कायदा, 1965 |
| • गरीबांना नि:शुल्क सहाय्य 39 A | • सेवा प्राधिकरण कायदा, 1987 | |
| • वन्यजीव व वने संरक्षण : 48 A | • वन्यजीव संरक्षण कायदा, 1972<br>• राष्ट्रीय वन धोरण 1988 | • वनसंरक्षण कायदा, 1980 |
| • बालकामगार व महीला संरक्षण: 39(f), 39 (a), 42 | • बालकामगार प्रतिबंध कायदा 1986<br>• समान वेतन कायदा, 1976 | • मातृलाभ कायदा, 1961 |
| • **लोकांचे जीवनमान उंचावणे :** 47 आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण | • समुदाय विकास कार्यक्रम, 1952<br>• रोजगार हमी योजना, 2006 | • किमान गरजा कार्यक्रम 1974<br>• राष्ट्रीय रोजगार हमी योजना |

## समान (एकरूप) नागरी कायदा आणि संविधान?

- संविधान कलम 44 नुसार, भारताच्या सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा प्राप्त व्हावा, यासाठी शासन प्रयत्न करेल.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले की राज्य प्रयत्न करेल म्हणजे कायदे निर्माण करेल परंतु जनतेच्या निर्णयाच्या विरोधात लादणार नाही.
- राज्य निर्णय लादत असेल तर याला लोकशाही नव्हे हुकूमशाहीच समजावे लागेल. जनतेच्या इच्छेच्या विरोधात जाऊन त्यांच्या वैयक्तिक जीवनात ढवळाढवळ करणे लोकशाहीला साजेशी भूमिका नाही.
- तसेच कलम 44 लक्षपूर्वक वाचले असता सामान्यातल्या सामान्य व्यक्तीच्या चटकन लक्षात आल्याशिवाय राहणार नाही की घटनेच्या कलमात कोठेही कॉमन सिविल कोडबद्दल भाष्य करण्यात आलेले नाही.
- घटनेचे कलम 44 युनिफॉर्म सिविल कोडबद्दल भाष्य करीत आहे. परंतु लोकांना भ्रमिष्ट करण्यासाठी जाणीवपूर्वक 'कॉमन' हा शब्द प्रयोगात आणला जात आहे.
- 'युनिफॉर्म' आणि 'कॉमन' यामध्ये खूप मोठा फरक आहे. हा फरक समजण्यासाठी थोडा शब्दांना समजण्याचा प्रयत्न करावा लागेल.
- कायद्याच्या पुस्तकात वापरण्यात आलेल्या प्रत्येक शब्दाला किंमत असते. त्याच्या अर्थावर कित्येक दृष्टीने चर्चा घडवून एक एक शब्द निर्धारित करण्यात आलेला असतो. संविधानात 'कॉमन' हा शब्द न वापरता 'युनिफॉर्म' हा शब्द वापरण्यात आलेला आहे.
- 'कॉमन' या शब्दाचा अर्थ समान असा आहे तर 'यनिफॉर्म' या शब्दाचा अर्थ एकसमान असा आहे.

## समान नागरी कायदा आणि कायद्यासमोर सर्व समान हे सारखेच का?

- समान नागरी कायदा आणि कायद्यासमोर सर्व समान यात खूप मोठा फरक आहे. काही लोकांना असा गैरसमज आहे की समान नागरी कायदा म्हणजे कायद्यासमोर सर्व समान असतील.
- कायद्यासमोर सर्व समानच आहेत. समान नागरी कायदा म्हणजे सर्वांचे सर्व कायदे रद्द करून एक सर्वसमावेशक कायदा तयार करणे. अर्थातच असा मसुदा तयार नसल्याने बहुसंख्याक समाजाला मान्य असणारा कायदा येथील अल्पसंख्याक समाजावर लादला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.
- समान नागरी कायदा म्हणजे काय?
- बऱ्याच जणांना गैरसमज आहे की समान नागरी कायदा म्हणजे मुस्लीम समाजाला 'मुस्लीम' असल्यामुळे देण्यात आलेली कायद्यात्मक सूट संपविणे.
- मुस्लीम समाजाचे 'मुस्लीम' असणे त्यांना कायद्याच्या कचाट्यातून सोडविते. अशाप्रकारे न्याय देताना धर्माच्या आधारावर भेद केला जातो.
- म्हणून न्याय करण्यासाठी 'समान नागरी कायदा' असलाच पाहिजे. वास्तविक पाहता 'समान नागरी कायद्याच्या' गोंडस नावाखाली ज्या कायद्याची मागणी केली जात आहे. त्याचा संबंध केवळ विवाह, घटस्पोट, दत्तक आणि वारसा या चार वैयक्तीक बाबींशी आहे. म्हणून यासाठी 'समान व्यक्ती कायदा' शब्दप्रयोग केला पाहिजे.
- समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी करणे म्हणजे व्यक्तिगत कायदे संपुष्टात आणून एकाच कायदा बलपूर्वक लागू करणे आहे, असाच अर्थ यातून निघतो.

## समान नागरी कायद्याने काय होईल?

- समान नागरी कायदा हा लोकशाही यशस्वीरीत्या कार्यरत राहण्याची एक अटच आहे.
- समान नागरी कायदा हा देशातून धार्मिक राजकारण पुसून टाकेल. धार्मिक विचारधारा दूर करून राष्ट्रीय एकात्मता वाढीला मदत करेल.
- व्यक्तिगत कायदे संपुष्टात आणुन एकच कायदा बलपूर्वक लागू करणे आहे.
- युनिफॉर्म सिव्हिल कोड महिलांना विवाह, घटस्फोट, देखभाल, मुलांचा ताबा, वारसा हक्क, दत्तक इत्यादी बाबतीत कोणत्याही धर्माचा विचार न करता न्यायालयांमध्ये समानतेचा व न्याय मिळण्याचा हक्क प्रदान करेल.

---

## समान नागरी संहिता

- भारतीय संविधानाने कलम 44 अंतर्गत राज्यसंस्थेवर समान नागरी संहिता तयार करण्याचे तत्व सांगितले आहे. मात्र अनेक धार्मिक समुदायाच्या विरोधामुळे ते होऊ शकले नाही.
- समान नागरी संहिता म्हणजे, ज्याद्वारे प्रत्येक मोठ्या धार्मिक समुदायाचे धर्मग्रंथ आणि सामाजिक रूढी व परंपरा यावर असलेल्या वैयक्तिक कायद्याच्या जागी देशातील सर्व नागरिकांना लागू होईल असा एकच सामायिक कायदा असावा.
- सामाजिक कायदा हा वैयक्तिक कायद्यापेक्षा वेगळा असतो. सामाजिक कायद्यामध्ये विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तक घेणे. पोटगी यांसारख्या विषयांचा समावेश होतो.
- 'गोवा' हे भारतातील एकमेव राज्य आहे. ज्याने सामाईक कौटूंबिक कायदा स्विकारला आहे. समान नागरी संहिता असणारे 'गोवा' हे एकमेव राज्य आहे.
- 1961 ला गोवा भारताचा भाग बनल्यावर संसदेने गोव्याला पोर्तुगीज सिव्हिल कोड, 1867 लागू करण्याची संमती दिली.
- गोव्यातील सर्व हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन इत्यादींना विवाह, घटस्फोट, वारसा हक्क, याबाबत हीच संहिता लागू होते.

---

**❊ मार्गदर्शक तत्वांचा इतिहास ❊**

| तेज बहाद्दूर सप्रू समिती 1945 | सर बी. एन. राव | मसुदा समिती |
|---|---|---|
| • **मुलभूत हक्कांचे दोन गटांत विभाजन :** न्यायप्रविष्ट आणि गैर–न्यायप्रविष्ट | • **वैयक्तिक हक्क दोन प्रकारचे असावे :** न्यायप्रविष्ट असलेले व न्यायप्रविष्ट नसलेले. न्यायप्रविष्ट नसलेले हक्क राजसंस्थेसाठी नैतिक तत्वे असावी. | • सर.बी.एन.राव. यांनी सुचवलेली शिफारस मसुदा समितीने स्विकारून भाग 4 मध्ये गैर–न्यायप्रविष्ट मार्गदर्शक तत्वे समाविष्ट केली. |

- **मार्गदर्शतत्वे न्यायप्रविष्ट न बनविण्याची कारणे :**
  1. नव्याने स्वतंत्र झालेल्या देशासमोर इतर महत्वाचे प्रश्न होते.
  2. देशातील प्रचंड विविधता व मागसलेपणा त्यांच्या अंमलबजावणीच्या आड येण्याची भिती होती.
  3. मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणीसाठी वित्तीय संसाधनांची कमतरता होती.